**प्रेमाच्या नावे राष्ट्राच्या विरोधात अघोषित युद्ध !**

# लव्ह जिहाद ?

मराठी (Marathi)

**लेखक**

**श्री. रमेश हनुमंत शिंदे**

**हिंदु जनजागृती समिती**

---

**प्रकाशक** : **सनातन भारतीय संस्कृती संस्था,** खोली क्र. १०३, सनातन आश्रम, सनातन संकुल, पोस्ट – ‘ओएन्‌जीसी’, देवद, तालुका पनवेल, जिल्हा रायगड (महाराष्ट्र) ४१० २२१. दू. क्र. : (०२१४३) २३३१२०

**आवृत्ती पहिली** : त्रिपुरारि पौर्णिमा, कलियुग वर्ष ५१२५ (२६.११.२०२३)

**तिसरे पुनर्मुद्रण** : हनुमान जयंती, कलियुग वर्ष ५१२७ (१२.४.२०२५)

प्रस्तुत ग्रंथ हिंदी, इंग्रजी, कन्नड, गुजराती, तमिळ, तेलुगु, मल्ल्याळम्, बंगाली आणि ओडिया या भाषांमध्ये उपलब्ध.

**मुद्रणस्थळ** : राम सीता प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर

**अर्पणमूल्य** : ₹ ५०/- (₹ 50/-)    **ISBN** 978-93-94097-99-5

© **प्रकाशक** All rights are reserved. No part of this publication maybe reproduced, stored in a retrieval system or transmitted, in any form or by any means, mechanical, photocopying, recording or otherwise, without prior written permission of the original publisher. Violators will be liable for criminal / civil action.

# ग्रंथाच्या लेखकांचा परिचय

## श्री. रमेश हनुमंत शिंदे (राष्ट्रीय प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती)



श्री. रमेश शिंदे यांनी स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रात शिक्षण घेतले आहे. 'सनातन धर्मभूषण', 'हिंदु कुलभूषण पुरस्कार' आदी पुरस्कारांनी सन्मानित आहेत. २५.६.२०२३ या दिवशी संस्कृतीरक्षणाच्या कार्यासाठी उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते त्यांना 'सांस्कृतिक योद्धा पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. ते पूर्णवेळ 'धर्मप्रसारक' म्हणून देशभर प्रवास करतात. धर्म आणि राष्ट्र यांच्या संदर्भातील विविध विषयांवरील अभ्यासू व्याख्याते आणि वृत्तपत्रातील स्तंभलेखक म्हणून ते ओळखले जातात. अनेक राष्ट्रीय दूरचित्रवाहिन्यांवरील चर्चासत्रांमध्ये ते हिंदु धर्माची बाजू प्रभावीपणे मांडतात. 'बुद्धीप्रामाण्यवाद्यांचा अहंकार', 'लोकशाहीतील दुष्प्रवृत्ती', 'धर्मांतर', 'हिंदु राष्ट्र', 'मनुस्मृति', 'हलाल जिहाद' आदी विषयांवरील ग्रंथांचे ते संकलक आहेत.

**Disclaimer** या ग्रंथाची निर्मिती 'लव्ह जिहाद'च्या नावाखाली मुसलमानेतर मुलींचे होणारे धर्मांतर आणि शोषण यांची वस्तूस्थिती समोर आणणे अन् भारतीय सुरक्षा व्यवस्था आणि कुटुंबव्यवस्था यांवर त्याचे परिणाम अभ्यासणे', या उद्देशाने करण्यात आली आहे. 'कोणत्याही धर्माचा अपमान करणे, धार्मिक भावना दुखावणे किंवा समाजात असंतोष निर्माण करणे', हा त्यामागील उद्देश नाही.

या ग्रंथातील कोणताही विषय वाचकाला 'राज्यघटनेच्या कलम ५१ अ' नुसार वैज्ञानिक दृष्टीकोन ठेवण्याला बाधा आणण्यासाठी लिहिलेला नाही. समाजात अंधश्रद्धा पसरवण्यासाठी किंवा वैद्यकीय उपचारांना किंवा वैज्ञानिक दृष्टीकोनांना विरोध करण्यासाठीही या ग्रंथातील लिखाण नाही. कृपया वाचकाने लक्षपूर्वक आणि डोळसपणे या ग्रंथाचा अभ्यास करावा. – **लेखक**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | उत्पत्ती आणि अर्थ     २. समानार्थी शब्द | ६ |
| ३. | उगम     ४. उद्देश | ८ |
| ५. | ‘लव्ह जिहाद’चे लक्ष्य (टारगेट) | १७ |
| ६. | ‘लव्ह जिहाद’मागील प्रेरणा आणि कट | २० |
| ७. | हिंदु तरुणींभोवती प्रेमपाश आवळण्याच्या योजनाबद्ध पद्धती | २३ |
| ८. | ‘लव्ह जिहाद’ला बळी पडलेल्या हिंदु स्त्रियांची होणारी परवड | ३८ |
| | ८ इ. वेश्याव्यवसायासाठी वापर | ३८ |
| | ८ ई. इस्लामी राष्ट्रांत विक्री | ३९ |
| | ८ उ. जिहादी कारवायांसाठी वापर | ४० |
| | ८ ऊ. फसवणूकीतून आत्महत्या | ४० |
| ९. | ‘लव्ह जिहाद’ला बळी पडलेल्या काही मुलींच्या दुर्दैवी कहाण्या | ४१ |
| १०. | व्याप्ती : राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय | ४५ |
| ११. | ‘लव्ह जिहाद’ वेगाने फोफावण्यामागील काही कारणे | ६४ |
| १२. | हिंदु तरुणींनो, खोट्या प्रेमासाठी आत्मघात करू नका | ७२ |
| १३. | हिंदु तरुणी आणि स्त्रिया यांनी घ्यावयाची दक्षता | ७५ |
| १४. | हिंदु पालकांनी घ्यावयाची दक्षता     १५. हिंदु समाजाला आवाहन | ७५ |
| १६. | ‘लव्ह जिहाद’ला आळा घालण्याचे उपाय | ८१ |
| 卐 | परिशिष्ट १ : संशयास्पदरित्या हरवलेल्या मुली व महिला यांची समस्या | ८४ |


---

**टीपा :** १. या पुस्तकात अन्य संदर्भग्रंथ, तसेच नियतकालिके आदींतून घेतलेल्या लिखाणाच्या अंती कंसात संदर्भक्रमांक घातले असून त्याचे विवरण शेवटी ‘संदर्भसूची’मध्ये दिले आहे. त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

२. पुस्तकात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## मनोगत

भारतात ‘लव्ह जिहाद’च्या घटना घडत असल्याचे आरोप अनेक वर्षांपासून होत आहेत; मात्र या विषयाच्या संदर्भात राष्ट्रीय स्तरावर चर्चा चालू झाली, ती ‘दी केरळ स्टोरी’ या चित्रपटामुळे ! हा चित्रपट केरळमधील सत्यघटनांवर आधारित होता. तथापि ‘सेक्युलर’वाद्यांनी त्यावर आक्षेप घेतला की, या चित्रपटात म्हटल्यानुसार प्रत्यक्षात केरळ राज्यात ‘लव्ह जिहाद’च्या ३२ सहस्र घटना घडल्याच नाहीत ! काही क्षणांपुरते मानूया की, ३२ सहस्र घटना घडल्या नसतीलही; मात्र ‘प्रत्यक्षात अशी एक जरी घटना घडली असली, तरी ती अयोग्यच आहे. ‘लव्ह जिहाद’द्वारे इस्लाम पंथात धर्मांतर करून ‘आयसिस’च्या आतंकवादी दलात सहभागी व्हायला गेलेल्या केरळमधील ४ युवती आता अफगाणिस्तानात अडकून पडल्याचे उघड झाले आहे, तरीही यासंदर्भात ‘लव्ह जिहाद’ला खोटे ठरवू पहाणारे विरोधक बोलण्यास सिद्धच नाहीत. मुसलमान मतपेढी टिकवून ठेवण्यासाठी ‘सेक्युलर’वाद्यांकडून ‘दी केरळ स्टोरी’ चित्रपटाला विरोध करण्यात आला. येथे आपण लक्षात घेतले पाहिजे की, जे ‘सेक्युलर’वादी ‘लव्ह जिहाद’ची वास्तविकता मांडणारा हा चित्रपट स्वीकारण्यास सिद्ध नाहीत, ते प्रत्यक्षातील ‘लव्ह जिहाद’ची भयानकता कसे स्वीकारतील ? ते हिंदु मुलींच्या रक्षणासाठी प्रयत्न करतील का ? F (IMu-LJ + IPm-C-TKeS + I4C1-Dn)

भारतातील हिंदु मुलींना कोणीतरी जिहादी प्रेमाच्या जाळ्यात फसवून त्यांचे माता-पिता, संस्कृती, धर्म, अस्तित्व सर्वकाही हिरावून घेतात, तसेच त्यांनाच स्वतःचे कुटुंब, देश आणि धर्म यांच्या विरोधात ‘जिहाद’ करण्यासाठी सिद्ध केले जाते, ही सामान्य गोष्ट नव्हे ! देहलीतील साक्षी दीक्षित हिची क्रूर हत्या असो वा मुंबईच्या श्रद्धा वालकर हिचे तुकडे तुकडे करणे असो, ‘या जिहादींना कोणतीही भीतीच राहिलेली नाही’, असे दिसते. श्रद्धा वालकर हिच्या हत्येनंतर देशात ‘लव्ह जिहाद’च्या घटनांवर गांभीर्याने चर्चा चालू झाली.

‘श्रद्धा वालकर हिची हत्या’, हे एकमेव प्रकरण नाही. त्यापूर्वी आणि

त्यानंतरही निधी गुप्ता, अंकिता सिंह, निकिता तोमर, काजल, तनिष्का शर्मा, खुशी परिहार, वर्षा चौहान, हीना तलरेजा, मानसी दीक्षित आदी शेकडो हिंदु तरुणींच्या संदर्भातही अशाच प्रकारची क्रूरता झाली आहे. अनेक मुलींचे मृतदेह बंद सुटकेसमध्ये मिळाले आहेत. कित्येक मुली देशोधडीला लागल्या आहेत; मात्र तरीही प्रत्येक दिवशी शेकडो मुली या प्रेमाच्या जाळ्यात अडकून जीवन उद्ध्वस्त करून घेत आहेत. भारताच्या अनेक राज्यांत धर्मांतराच्या विरोधात कायदे बनवण्यात आले आहेत; मात्र हा कायदा या 'लव्ह जिहाद'च्या घटनांना रोखण्यास सक्षम ठरलेला दिसत नाही. F (IMu-LJ)

एकीकडे सेक्युलरवाद्यांचा दावा आहे, 'लव्ह जिहाद' ही केवळ एक काल्पनिक गोष्ट आहे. हे प्रत्यक्षात अस्तित्वातच नाही; परंतु प्रत्यक्षात 'हिंदु युवतींना प्रेमाच्या जाळ्यात अडकवणे, त्यांचे धर्मांतर करून त्यांना मुसलमान बनवणे, त्यांच्यावर सामूहिक बलात्कार करणे आणि त्यांची हत्या करणे', अशा घटना प्रतिदिन उघडकीस येत आहेत. मग हा विरोधाभास का आहे ? या संदर्भात वास्तविकतेचे आणि काही सूत्रांचे अवलोकन करणे अत्यंत आवश्यक आहे. F (IMu-LJ + I4C1-Dn)

'लव्ह जिहाद' हे हिंदु धर्म आणि हिंदु राष्ट्र यांच्या विरोधातील एक अघोषित युद्धच आहे. या षड्यंत्रामध्ये हिंदुस्थानचे शत्रूराष्ट्र पाकिस्तानचा सर्वाधिक सहभाग आहे. हे सर्वश्रुत आहे की, भारताची गोपनीय माहिती हस्तगत करण्यासाठी हिंदुस्थानच्या दूतावासात उच्च पदावर असलेल्या गुप्तचर महिला अधिकारी माधुरी गुप्ता यांना पाकिस्तानच्या सेनाधिकाऱ्याने आपल्या प्रेमपाशात अडकवून फसवले होते, म्हणजे 'लव्ह जिहाद'च्या रूपातील हे छुपे युद्ध प्रत्यक्ष आतंकवादी आक्रमणापेक्षाही भयानक आहे. या राष्ट्रव्यापी समस्येचे सर्व प्रकारे विश्लेषण करण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे. F (IMu-LJ + IHR-Vi-IMu + I4B-Pak)

स्वत:साठी, तसेच ओळखीच्या किमान १० हिंदू तरुणींच्या कुटुंबियांना भेट देण्यासाठी हे पुस्तक विकत घ्या व हिंदुजागृती करा ! F (IMu-LJ)